॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बी.बी.ए., बी. एम. एस., बी.एम.एस.(ई-कॉमर्स), बी.सी.ए., एम.एम.एस.(कॉम्प्युटर मॅनेजमेंट), एम.एम.एस.(पर्सोनेल मॅनेजमेंट), एम.सी.ए. (Integrated) व एम.बी.ए. (Integrated) या वर्गांच्या पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता दुसरी केंद्रीय सामाईक प्रवेश परीक्षा दि. १० ऑगस्ट २०२३ रोजी के.सी.ई. सोसायटीचे आय.एम.आर., जळगाव या परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे.

यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) दि. ५ ऑगस्ट २०२३ पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर प्रवेश अर्ज संकेतस्थळावर भरण्याची अंतिम मूदत दि. ८ ऑगस्ट २०२३ पर्यंत आहे. प्रवेशास पात्र विद्यार्थ्यांची यादी आणि प्रवेशपत्र (Hall Ticket) दि. ९ ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर Processing Fee Rs.५००/- ऑनलाईन Net Banking आणि UPI व्दारे भरायची आहे. ऑनलाईन भरलेला प्रवेश अर्ज व फी भरल्याची पावती विद्यार्थ्यांनी स्वत:कडेच ठेवायची आहे. भरलेला अर्ज विद्यापीठात किंवा महाविद्यालयात जमा करायचा नाही. सदर केंद्रीय सामाईक प्रवेश परीक्षा ही अंतिम असून यानंतर पुन्हा परीक्षेचे आयोजन करण्यात येणार नाही. कृपया सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी यांची नोंद घ्यावी. अशी माहिती केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीचे अध्यक्ष प्रा. ए. पी. डोंगरे अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा यांनी कळविले आहे.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ४ ऑगस्ट , २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी